सायंदैनिक

# गुड इव्हिनिंग City

goodeveningcity@gmail.com

८ एप्रिल २०२५, मंगळवार | वर्ष १४ वे | अंक ७ | पृष्ठे ६ | किंमत ३ रू.




# सरकारला वाटेल तेव्हा निश्चितच कर्जमाफी होईल : ना.पाटील



**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार हे आपल्या स्पष्टेवक्तेपणासाठी ओळखले जातात. महायुती सरकारने २०२४ च्या विधानसभा निवडणूकी दरम्यान शेतकऱ्यांच्या कर्ज माफीचे आश्वासन दिले होते. परंतू आता सध्या राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता. राज्याचे उमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी एका शेतकरी मेळाव्याला संबोधित करातांना सांगितले की, ३१ मार्चच्या आत शेतकऱ्यांनी आपले कर्ज भरून टाकावे सध्या कर्जमाफी शक्य नसून शेतकऱ्यांनी कर्ज भरण्याचे आवाहन केले होते. त्यानंतर विरोधी पक्ष व विविध शेतकरी नेत्यांनी त्यांच्यावर टिकेची झोड उठवली होती. यासंबधी राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांना विचारणा केली असता ते म्हणाले की, अजित दादांच्या वक्तव्याचा काही जण चुकीचा अर्थ लावत आहेत. कर्जमाफी सध्या करता येणार नाही, मात्र कर्जमाफी होणारच नाही असं अजिबात नाही असं मकरंद पाटील म्हणाले. लाडक्या बहिणींसह विविध योजनांवर राज्य सरकार मोठा खर्च करत आहे, त्यामुळे सरकारला वाटेल तेव्हा निश्चितच कर्जमाफी होईल असे मकरंद पाटील यांनी सांगितले. आठवडाभरापूर्वी बारामतीत झालेल्या एका शेतकरी मेळाव्यात अजित पवारांनी कर्जमाफी होणार नसल्याचे स्पष्ट सांगितले होते. राज्याची तशी आर्थिक परिस्थिती नसल्याचे अजित पवार म्हणाले होते. यावर विरोधक महायुती सरकारवर टीका करत आहेत.. दरम्यान याच मुद्द्यावरून आज पत्रकारांनी पालकमंत्री मकरंद पाटील यांना विचारणा केली. कर्जमाफी होणारच नाही असं अजिबात नाही, अजितदादांच्या वक्तव्याचा अनेकांनी चुकीचा अर्थ घेतला, लाडकी बहीण योजनेसह अनेक योजनांवर राज्य सरकार खर्च करत आहे, त्यामुळे सरकारला वाटेल तेव्हा निश्चितच कर्जमाफी होणार आहे अस मकरंद पाटील म्हणाले. शेतकरी आत्महत्या संदर्भात राज्य सरकार अतिशय संवेदनशील आहे. कालपर्यंत २ हजार सातशे कोटी रुपये आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबाला मदत देण्यात आलेली आहे. शेतकरी आत्महत्या आणि आत्महत्येची कारणे यावर राज्य सरकारकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. शेतकरी आत्महत्या थांबवण्यासाठी शेतीला शाश्वत पाणी देण्यासाठी विविध प्रकल्प सरकारने हाती घेतल्याचे पालकमंत्री मकरंद पाटील म्हणाले. यावेळी पत्रकारांनी लोणार सरोवराच्या विकासावर देखील पालकमंत्री पाटील यांना प्रश्न विचारला, यावर ते म्हणाले की, बुलढाणा जिल्हा ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा आहे. मात्र पैशाच सोंग करता येत नाही.. लोणार सरोवर, राजमाता जिजाऊ यांचा जन्मस्थळ असलेल्या सिंदखेडराजा येथे विकासासाठी अतिरिक्त प्रस्तावाला मंजूर करून कशा पद्धतीने ही ऐतिहासिक स्थळे जतन केले जातील आणि इतिहास जिवंत ठेवला जाईल याचा प्रयत्न राज्य सरकार करीत असल्याचे पालकमंत्री पाटील यांनी माध्यमांशी बोल–तांना सांगितले.




# कंगना मानत असेल मी मोदींना देवाचा अवतार मानत नाही : ना.आठवले




**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : पक्षामधील प्रमुख नेत्यांचे लांगूलचालन नवीन प्रकार नाही. नेता, मंत्री यांच्या चप्पल हातात धरणे, वयाने छोटे असूनही त्यांना दंडवत घालणे किंवा त्यांना आई–वडीलांपेक्षाही मोठा दर्जा देणारे अनेक जण आहेत. अर्थात कुणासाठी हा श्रद्धेचा किंवा आदराचा भाग असू शकतो. हिमाचल प्रदेशमधील मंडी लोकसभेच्या खासदार तसेच सुप्रसिद्ध अभिनेत्री कंगना रणावत यांनी आपल्या ताज्या विधानात नरेंद्र मोदींना देवाचा अवतार संबोधले आहे. पण भाजपसोबत सत्तेत असणारे केंद्रीय मंत्री ना. रामदास आठवले मोदींना देवाचा अवतार मानायला तयार नाहीत. त्यांनी स्पष्टपणे म्हटले की, 'मोदीजी देवाचा अवतार नाहीत.'. आज, बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर आलेले केंद्रीय सामाजिक न्यायमंत्री ना. आठवले यांनी शासकीय विश्राम भवनावर पत्रकार परिषद घेतली. पत्रकारांनी जेव्हा त्यांना खा. कंगना रणावत यांच्या मोदीजी देवाचा अवतार, या विधानाबाबत प्रतिक्रिया विचारली तेव्हा ते म्हणाले की, 'मोदीजी देवाचा अवतार मी मानत नाही.. ते मानवाचा अवतार आहे. नरेंद्र मोदी हे अंत्यंत स्ट्राँग असणारे प्रधानमंत्री आहे. अन् आता एक सर्व्हे झाला होता जगातील सर्व अध्यक्ष आणि पंतप्रधानांच्या नेतृत्वाचा सर्व्हे झाला त्यामध्ये ८०% लोकांनी पसंती दिली आहे. जगातील सर्वात लोकप्रिय नेते म्हणून त्यांचं नाव आहे.. तसेच ते पंतप्रधान पंडीत नेहरूंचा विक्रम मोडतील, असे कौतुकोद्गारही ना. आठवले यांनी काढले. सर्वात यशस्वी पंतप्रधान म्हणून त्यांना संपूर्ण जगाने मान्यता दिली असल्याचेही केंद्रीय मंत्री आठवले म्हणाले.

राज ठाकरे यांनी जो मराठीचा मुद्द हाती घेतला आहे. तो योग्य आहे परंतू दादागीरकरून तो मुद्दा हातळणे योग्य नाही. राज ठाकरे यांचा मनसे पक्ष हा २०२४ च्या लोकसभा निवडणूकीमध्ये महायुतीचा घटक असतांना त्याचा फायदा झाला नाही. मात्र २०२४ च्या विधानसभा निवडणूकीत राज ठाकरे महायुतीचा घटक नसतांना महायुतीला मोठे यश मिळाले. उध्दव ठाकरे हे महायुतीची साथ सोडून २०१९ च्या विधानसभा निवडणूकीत त्यांनी महाविकास आघाडीच्या घटक पक्ष असलेल्या काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस सोबत गेल्याने उध्दव ठाकरे यांच्यावर हे दिवस आले आहे. आता २० आमदार आले पण पुढे त्यांचे ४–५ आमदार निवडून येतील असे केंद्रिय सामजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी सांगितले.

## Walk in Interview

Shri Shivaji Education Society, Amravati's

**Bal Shivaji Convent, Buldhana**

Circular Road, Buldhana

**WANTED**

| Sr. No | Name of Post | No. of Post | Required Qualification |
|---|---|---|---|
| 1 | Principal | 01 | B.A./B.Sc with D.Ed/B.Ed.(P.G. candidates will be preferred |
| 2 | Pre-Primary Teacher | 07 | Any Graduate B.Ed/D.Ed |
| 3 | Primary Teacher | 13 | H.Sc D.Ed/B.A. D.Ed |
| 4 | Physical Education Teacher | 01 | Graduate, B.P.Ed. |
| 5 | Clerk | 02 | Graduate, MS-CIT |
| 6 | Helper (Ladies Only) | 05 | S.S.C |
| 7 | Peon | 02 | S.S.C |

Note :- 1. Preference will be given the experienced candidates.
2. Fluency in English is must.
3. Eligible from interested candidates may walk in interview on 11/04/25 at 10: 30 for details contact 9067057512
Veneu :- Bal Shivaji Convent, Buldhana

Signature Principal
Bal Shivaji Convent,
Buldhana

President
School Committee,
Bal Shivaji Convent, Buldhana

## समता भूमि ते सत्यशोधक भूमि मशाल यात्रा





छायाचित्र : रविकिरण टाकळकर

**बुलढाणा, ८, एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त समता भूमि पुणे ते सत्यशोधक भूमि बुलढाणा या मशाल यात्रेचे बुलढाणा नगरीत भव्य स्वागत करण्यात आले. धाड नाका परिसरात पुण्याहून आलेल्या मशाल यात्रेचे फटाक्यांच्या आतिषबाजीत स्वागत करण्यात आले. मशाल यात्रेची मोटरसायकल रॅली छत्रपती शिवाजी महाराज स्मारक, क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले स्मारक पासून महात्मा जोतिबा फुले शाळेत आली. याठिकाणी मशालीची स्थापना करण्यात आली. दिनांक १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपर्यंत ही मशाल सतत तेवत राहणार आहे. शहरात ठिकठिकाणी मान्यवरांनी मशाल यात्रेचे स्वागत केले.



# जनसुरक्षा कायद्याच्या नावाखाली अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध

## खामगावातील पत्रकाराच्या वतीने निषेध : कायदा लागू न करण्याची मागणी

**खामगाव, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्र राज्य सरकार नव्याने लागु करीत असलेला जनसुरक्षा कायदा पत्रकारांची मुस्कटदाबी करणारा असल्याचा आरोप करत आज येथील उपविभागीय कार्यालयासमोर खामगाव शहर व तालुक्यातील पत्रकारांनी निदर्शने करत या कायद्याला तीव्र विरोध दर्शविला. हा कायदा त्वरित रद्द करावा अशी मागणी करण्यात आली असून या संदर्भात. उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत राज्याचे राज्यपाल मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. सदर निवेदनात नमूद आहे की, महाराष्ट्र राज्य सरकार नव्याने लागु करीत असलेल्या जनस-रक्षा कायद्याच्या नावाखाली पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध लावण्याचा प्रयत्न करत आहे. हा कायदा अत्यंत चुकीचा आहे. जर एखाद्या सरकारमधील मंत्री आमदार किंवा शासकीय अधिकारी यांच्या अभिव्यक्ती चुकीच्या प्रकाराबाबत किंवा भ्रष्टाचाराच्या विरोधातील बातमी प्रकाशित केली तर ही बातमी राष्ट्रहिता विरोधी बातमी सांगून या बातमीला हटविण्याचा व पत्रकारांवर कारवाई




करण्याचा अधिकार सरकार स्वतःकडे राखुन घेत आहे. ऐकप्रकारे सरकार या कायद्यामुळे पत्रकारांची व प्रसार माध्यमांची मुस्कटदाबी करीत आहे. सत्य जगा समोर आणण्यापासुन पत्रकारांना व माध्यमांना रोखत आहे. हे सरकारचे मनमानी धोरण पत्रकार बांधवांना मान्य नसुन या कायद्याला राज्यातील समस्त पत्रकार संघटनांनी विरोध दर्शविला आहे. सरकारने हा कायदा तत्काळ रद्द करावा व पत्रकारांचा अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूळ हक्क त्यांना प्रदान करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनाची दखल घेऊन तात्काळ हा कायदा लागू करु नये जर हा कायदा रद्द न केल्यास यापुढे विविध प्रकारचे उग स्वरूपाचे आंदोलने करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी विविध पत्रकार संघटनेचे पदाधिकारी सदस्य व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खामगाव अर्बन बँकेला ९ कोटी ५७ लाख रुपयांचा नफा

**दुसरबीड, ६ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : खामगाव दि. ०८ एप्रिल ( गुड इव्हीनींग सिटी ) : सहकारी क्षेत्रात अग्रगण्य खामगांव अर्बन बँकेने आपली शुध्द नफ्याची परंपरा कायम राखत आर्थिक वर्ष ३१ मार्च २०२५ अखेर रु. ९.५७कोटी निव्वळ नफा मिळविला असून ढोबळ नफा रु.२३.३३ कोटी झाला आहे. ढोबळ नफ्यामधून यावर्षी बँकेने काही शाखा रिन-व्हेशन, शिफ्टींग, नविन शाखा ओपनिंग, तसेच बी. डी. डी. आर. च्या प्रोव्हीजन्स केल्यानंतर सुध्दा रु. ९.५७कोटी निव्वळ नफा झाला आहे. ३१ मार्च २०२५ चे आधारावर बँकेने नियोजनबध्द वसुली केली आहे, त्यामुळे आर्थिक मंदीची लाट असतांना सुध्दा बँकेचे ग्रॉस एन. पी. ए. ३.७९ टक्के असून नेटएन. पी. ए. शुन्य टक्के आहे. बँकेच्या एकूण ठेवी रु. १२६५.२१ कोटी असून यामध्ये लो-कॉस्ट डिपॉझीट रुपये ५४१.७० कोटी आहे. लो-कॉस्ट डिपॉझीटचे प्रमाण ४२.८२ टक्के आहे. हे प्रमाण इतर सहकारी बँकांच्या तुलनेत खूप जास्त आहे त्यामुळेच बँक नफा कमावू शकली. बँकेच्या या प्रगतीमध्ये ठेवीदार, सभासद खातेदार, हितचिंतक, मार्गदर्शक यांचा मोलाचा वाटा आहे. प्रगतीची घोडदौड अशीच कायम ठेवून या आर्थिक वर्षात सुध्दा नविन ३ ते ४ शाखां उघडण्याचा संचालक मंडळाचा मानस असल्याचे बँकेचे अध्यक्ष प्रा. विजयजी पुंडे यांनी कळविले आहे.

# अमडापूरच्या विहिरीतील जाळ्यात अडकला बिबट्या; परिसरात भितीचे वातावरण

**चिखली, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : तालुक्यातील अमडापूर शिवारातील जांभूळ खोरा येथे पडक्या विहिरीच्या भोवती लावलेल्या जाळीत रात्रीच्या दरम्यान पाण्याच्या शोधात गेलेला बिबट्या अडकला होता. रात्रीच्या दरम्यान बिबट्या जाळ्यात अडकून पडलेला होता. ही घटना ७ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता पंप सुरू करण्यासाठी विहिरीवर शेतकरी गेले असता त्यांना जाळ्यात बिबट्या अडकलेला आढळला. ६ एप्रिल रोजी सकाळी चिखली तालुक्यातील पांढरदेव शिवारात बिबट्याने दोन गायीचे वासरू फस्त केले. मागील महिन्यात मुंगसरीत बिबट्याच्या हल्ल्यात गाय दगावली होती,शेलगाव जहागीर मध्ये गाईवर हल्ला केला होता तालुक्यात बिबट्याची दहशत दिवसेंदिवस वाढत चालली आहे. बिबट्याचे दर्शन होत नाही असा एकही दिवस नाही. तालुक्यातील वेगवेगळ्या गाव शिवारात बिबट्याचे दर्शन घडत असते त्यांचाही बंदोबस्त करणे गरजेचे आहे. जाळ्यात अडकलेल्या बिबट्या जेरबंद करण्यासाठी वनविभाचे



कर्मचारी त्वरित घटनास्थळी पोहोचले यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी अभिजित ठाकरे, वनपाल उदयनगर नेवरे, डॉ. व्ही. व्ही. आवटे, पशुधन विकास अधिकारी अमरावती डॉ. सागर पाटील, वनरक्षक आय. बी. गवारगुर, संदीप मडावी पवन वाघ, अमोल चव्हाण, राम लोंढे यांचा समावेश आहे. तर उद्धव पाटील, विनायक सरनाईक, अब्दुल आजीम,संतोश शेळके, रमेश पाटील, शरद राऊत,रमेश पाटील,अरुण राऊत, पुरुषोत्तम कव्हर या नागरिकांनी वनविभागाला मदत केली. यावेळी अमडापूर पोलिस स्टेशनचे कर्मचारी बंदोबस्तासाठी उपस्थित होते.

# बेपत्ता महिलेचा मृतदेह विहिरीत आढळला

**चिखली, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : शहरातील गौरक्षण वाडी परिसरातील रामानंद नगर येथील महिला दोन दिवसापासून बेपत्ता होती. तिचा मृतदेह ६ एप्रिल रोजी सायंकाळी स.द. मस्के रोडवरील विहिरीत आढळून आला.

शहरातील रामानंदनगर येथील रहिवासी दुर्गाबाई राजपूत (वय ६५) या मागील दोन दिवसापासून बेपत्ता होत्या. त्यांच्या नातेवाईकांनी ४ एप्रिल रोजी पोलीस स्टेशनला हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानंतर त्यांचा शोधही घेण्यात आला. मात्र ६ एप्रिल रोजी सायंकाळी पाच-सहा वाजे दरम्यान स.द मस्के रोडवरील विहिरीत त्यांचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. सदर घटनेची माहिती पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांनी धाव घेत पंचनामे केला.

## श्रीक्षेत्र माकोडीत रामनवमी निमित्त शोभायात्रा; रामनामी रंगले भाविक

# नामस्मरणाने भगवंताच्या प्रेमाची ओढ लागेल : श्रीहरी महाराज







**मोताळा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : मायबाप संतांचे मनुष्य जीवनावर मोठे उपकार आहेत. भगवंताच्या नामाची गोडी लावण्याचे काम संत करतात. रामनामाचा महिमा अगाध आहे. रामनामाचा ध्यास घेतल्याने शाश्वत असलेले सुख म्हणजे समाधान प्राप्त होते. भगवंताच्या प्रेमाची ओढ लागण्यासाठी अट्टाहासाने नामस्मरण करा असे मार्गदर्शन समर्थ सद्गुरु श्री. श्रीहरी महाराज यांनी केले.

माकोडी येथे राम नवमी निमित्त चैतन्य मंदिर परिसरात जमलेल्या भाविकांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. श्रीक्षेत्र माकोडी आज रामनामी रंगून गेले होते. रामनवमी निमित्त ६ एप्रिल सकाळी काकडा आरती, अभिषेक व विधिवत पुजा-अर्चा पार पडल्यानंतर आकर्षक सजविलेल्या रामरथासह श्रीहरी महाराजांच्या प्रमुख उपस्थितीत गावातून शोभायात्रा काढण्यात आली. भगवे झेंडा धारी सेवक, अश्व, टाळ-मृदगांचा गजर, व राम नामाचा जयघोष करीत भाविकांनी शोभायात्रेत सहभाग घेतला. यावेळी यात्रेत महिला-पुरुष भाविकांनी आनंदोत्सव साजरा करीत फुगड्यांचे फेर धरले.

प्रभूरामचंद्राच्या जयघोषाने माकोडी दुमदुमन गेली होती. शोभायात्रेच्या स्वागतासाठी परिक्रमा मार्गात सडासमार्जन करुन आकर्षक रांगोळ्या देखील काढण्यात आल्या होत्या. त्यानंतर दुपारी चैतन्य मंदिरात रामजन्माची कथा सांगून रामजन्म सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी श्रीहरी महाराज म्हणाले की, भवसागरात तरुण जाण्यासाठी ईश्वराचे नामस्मरण करणे आणि सेवा कार्यात सहभागी राहणे आवश्यक आहे. ईश्वराचा अवतार हा दृष्टांचा संहार, नाश करण्यासाठी असतो. मात्र संत, सद्गुरु हे मार्ग चुकलेल्यांना देखील चांगला मार्ग दाखवितात. भगवंताची मनाप-ासून सेवा केल्याने त्याच्या नामाची गोडी लागते. आणि यातून मग जी-वनाचे खरे मर्म समजते. त्यामुळे प्रत्येकाने दररोज थोडे का होईना रामनामाचा जप करावा, असेही श्रीहरी महाराज म्हणाले. राम जन्मसोहळ्याच्यानिमित्ताने हभप ज्ञानेश्वर माऊली निरपूकर यांनी किर्तन सेवा दिली. ७ एप्रिल रोजी रोजी महाप्रसादाने या सोहळ्याची सांगता होणार आहे.

## डी.जे. मुळे..

डी. जे. मुळे गाव शहरांची समाधानकारक
शांतता भंग झाली।

या कर्कशकर डी.जे. पाई जनता
त्रस्त अन् तंग झाली ।।

डीजेच्या तालावर नाचण्यात
तरुणाई दारू पिवून पंग झाली ।

काही टुकार कुसंस्कारी मंडळी
बेधुंद बेकार दारूच्या नशेत चिंग झाली ।।

बेवड्याची टोळी बाराचे वर रात्री
बेटाईम नाचण्यात दंग झाली ।

या दारूड्यांमुळे अनेक लग्न जयंती
उत्सवात हाणामारीपर जंग झाली ।।

जणू कायद्याचा उरला नाही का? धाक ?
म्हणून बेवडी टोली निसंग झाली।

अशी काही बहुसंख्य बहुजनांची
अवस्था व्यवस्था बेकार बेढंग झाली ।।

**समाधान जाधव, नांद्राकोळी**
**मो.नं 9021654573**

# मलकापूर तालुक्यातील सरपंच पदाचे आरक्षण; १६ एप्रिलला सोडत

**मलकापूर, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या अधिसूच-नेनुसार मलकापूर तालुक्यातील ४९ ग्रामपंचायतींच्या सरपंच पदांची आरक्षण निश्चित करायचे आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम ३० अन्वये तसेच मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील तरतुदीनुसार सन २०२५ ते २०३० दरम्यान मलकापूर तालुक्यातील सार्वत्रिक निवडणूकीद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच पदांचे आरक्षण १६ एप्रिल २०२५ रोजी प्रशासकीय इमारत, तहसिल कार्यालय, मलकापूर येथे सोडत काढण्यासाठी सभा आयोजित करण्यात आले आहे. तसेच अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग व खुल्या प्रवर्गा अंतर्गत महिलांकरीता आरक्षण सोडत २५ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता जिल्हा नियोजन समिती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे सूरु होणार असून उपविभाग मलकापुर अंतर्गत मलकापूर तालुक्याचे महिलांकरीता आरक्षण सोडत दुपारी २.०० वाजता निश्चीत करण्यात येणार आहे.

सदर आरक्षण सोडतीकरीता मलकापूर तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी व नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मलकापूर तहसिलदार आर.एम.तायडे यांनी कळविले आहे.

## कार्यालय नगर पंचायत, मोताळा जिल्हा बुलढाणा

### ई- निविदा सुचना

**वैशिष्टपूर्ण योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत प्राप्त निधीतून विकास कामे**

नगर पंचायत मोताळा जिल्हा बुलडाणाचे वतीने मोताळा नगर पंचायत यांचे तर्फे महाराष्ट्र शासना कडील योग्य त्या वर्गातील वैध नोंदणीकृत कंत्राटदार कडून दोन लिफाफा पद्धतीने करारनाम्यावरील खालील कामांच्या निविदा BOQ वर टक्केवारी दराने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | विकास काम निविदा प्रसिद्धी रक्कम | कामाची निविदा अंदाज पत्रकीय रक्कम रुपये | इसारा रक्कम | निविदा प्रपत्र किंमत रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ |
| १ | मोताळा नगर पंचायत हद्दीतील जुनागाव येथे न पा चे व्यायाम शाळा बांधकाम करणे | १५६८५८१.00 | २०,००,००० | २% | ५००.00 |
| २ | मोताळा नगर पंचायत हद्दीत न पा चे जैन भवन विकसीत करणे | १०१२१७८.00 | १२,५०,००० | २% | ५००.00 |

ई निविदा कोरा नमुना "http://www.mahatendars.gov.in" या संकेतस्थळावर दि.०८/०४/२०२५ सकाळी ११.०० वाजे पासून ते दि १५/०४/२०२५ दुपारी १७.०० वाजे पर्यत उपलब्ध राहतील. परिपूर्ण रीत्या भरलेल्या ई निविदा दि १६/०४/२०२५ रोजी न.प. कार्यालयात उघडण्यात येतील. नियमा बाबत सविस्तर अटी व शर्ती न.प. कार्यालयात कार्यालयीन वेळत व उपरोक्त संकेत स्थळावर पाहावयास मिळतील. तरी निविदा कारांनी त्यानुसार निविदा प्रक्रिया करावी.

-स्वा-
(गणेश पांडे)
मुख्याधिकारी
नगर पंचायत मोताळा

# नीट परीक्षा १७ ऑगस्ट रोजी होणार का? विद्यार्थ्यांसाठी इशारा

NEET परीक्षांबाबत अनेक अधिसूचना अधिकृतपणे जारी केल्या जातात, ज्यामध्ये परीक्षेशी संबंधित सर्व माहिती असते. त्यात अर्जाच्या तारखा, परीक्षेच्या तारखा आणि शेवटी निकालाच्या तारखा देखील अधिकृतपणे जाहीर केल्या जातात. अनेक वेळा विद्यार्थी त्यांच्या मित्रांच्या माहितीसाठी सोशल मीडियावर नोटिस शेअर करतात, परंतु ते शेअर करण्यापूर्वी अधिकृत वेबसाइटवर त्याची पुष्टी करणे खूप महत्वाचे आहे.

अलिकडेच एक प्रकरण समोर आले आहे जिथे सोशल मीडियावर एक बनावट सूचना व्हायरल होत आहे ज्यामध्ये NEET PG परीक्षेच्या तारखांबाबत दावे केले जात आहेत आणि असे म्हटले जात आहे की NEET PG ची नियोजित तारीख बदलण्यात आली आहे आणि आता ही परीक्षा १५ जून ऐवजी १७ ऑगस्ट २०२५ रोजी घेतली जाईल, तर ही माहिती पूर्णपणे चुकीची आहे. नीट पीजीची अशी कोणतीही अधिकृत सूचना जारी केलेली नाही. सरकारी वृत्तसंस्था पीआयबीने यावर स्पष्टीकरण दिले आहे आणि सरकारने विद्यार्थ्यांसाठी इशारा देखील जारी केला आहे.

# फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षण घ्यायचं?

## ट्यूशन फी, राहण्याचा अन् जेवणाचा खर्च किती?

**अमेरिकेचे फ्लोरिडा राज्य त्याच्या सुंदर समुद्रकिनारे, मगरी आणि स्पॅनिश संस्कृतीसाठी ओळखले जाते. फ्लोरिडा हे अमेरिकेच्या आग्नेय भागात वसलेले एक राज्य आहे, जिथे जगभरातील लोक राहतात. येथे देशातील सर्वोत्तम संस्थांपैकी एक, फ्लोरिडा विद्यापीठ आहे, जे त्याच्या शैक्षणिक मानकांसाठी आणि मजबूत संशोधनासाठी ओळखले जाते. पदवीपूर्व ते पदव्युत्तर अभ्यासक्रमांपर्यंत येथे शिक्षण दिले जाते. फ्लोरिडा विद्यापीठात जगभरातून विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी येतात.**




अमेरिकेत शिक्षण घेणे खूप महाग आहे आणि तेच फ्लोरिडा विद्यापीठाला लागू होते. इथे शिक्षण घेण्यासाठीही तुम्हाला भरपूर पैसे लागतील. अशा परिस्थितीत जर तुम्हाला फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्हाला कोणत्या गोष्टींवर किती पैसे खर्च करावे लागतील हे समजून घ्यावे लागेल. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी तुम्हाला किती पैसे खर्च करावे लागतील ते जाणून घेऊया...

अमेरिकेत अशी अनेक विद्यापीठे आहेत जिथे स्थानिक विद्यार्थ्यांकडून कमी शुल्क आकारले जाते तर परदेशी विद्यार्थी आणि इतर राज्यांमधून शिक्षण घेण्यासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांना जास्त शुल्क भरावे लागते. हाच नियम फ्लोरिडा विद्यापीठाला लागू आहे. उदाहरणार्थ, परदेशी विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ शुल्क खूप जास्त आहे तर इतर खर्च स्थानिक विद्यार्थ्यांप्रमाणेच राहतात. जर तुम्हाला येथे पदवीपूर्व शिक्षण घ्यायचे असेल तर तुम्हाला एका वर्षात एकूण $४६,४५८ (सुमारे ४० लाख रुपये) खर्च करावे लागतील.

शिक्षण शुल्काची किंमत $२८,६५८ आहे; पुस्तके, साहित्य आणि उपकरणांची किंमत $१,२३५ आहे; वाहतुकीचा खर्च $१,६६०; राहण्याचा खर्च $१२,६१५; वैयक्तिक खर्चामध्ये $२,२३४ आणि फेडरल विद्यार्थी कर्ज शुल्क $५६ समाविष्ट आहे.

### शिष्यवृत्तीचे पर्याय काय आहेत?

- जर तुम्हाला शिष्यवृत्ती मिळाली तर फ्लोरिडा विद्यापीठात शिक्षणाचा खर्च आणखी कमी होऊ शकतो. येथे, शिष्यवृत्तींसोबत, तुम्हाला फेडरल स्टुडंट लोन आणि वर्क स्टडी प्रोग्रामचा पर्याय देखील मिळतो, ज्यामुळे अभ्यासाचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होतो.
- फेडरल स्टुडंट लोन : विद्यापीठातील विद्यार्थी फेडरल लोनसाठी अर्ज करू शकतात. पदवीपूर्व विद्यार्थ्यांसाठी कर्ज शुल्क कमी आहे.
- अनुदान आणि शिष्यवृत्ती : फ्लोरिडा आणि इतर राज्यांमधील विद्यार्थ्यांसाठी शिक्षण खर्च कमी करण्यासाठी विद्यापीठ गुणवत्तेवर आणि गरजांवर आधारित शिष्यवृत्ती देते.
- वर्क-स्टडी प्रोग्राम : फेडरल वर्क-स्टडी प्रोग्राम विद्यार्थ्यांना अर्धवेळ नोकरी करण्याची संधी देतो. यातून ते त्यांचे शैक्षणिक खर्च भागवू शकतात.

# महाराष्ट्र सीईटी प्रवेशपत्र २०२५ कसे डाउनलोड करावे?

महाराष्ट्र राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून MHT CET 2025 प्रवेशपत्र लवकरच जारी केले जाणार आहे. परीक्षेला बसलेले विद्यार्थी cetcell.mahacet.org या अधिकृत वेबसाइटवरून PCM आणि PCB गटासाठी त्यांचे प्रवेशपत्र आणि हॉल तिकीट डाउनलोड करू शकतात. पीसीबी गटाची परीक्षा ९ एप्रिल ते १७ एप्रिल दरम्यान होईल आणि या काळात १० आणि १४ एप्रिल रोजी कोणतीही परीक्षा होणार नाही. त्याच वेळी, पीसीएम गट परीक्षा १९ एप्रिल ते २७ एप्रिल दरम्यान होणार आहे. यामध्ये २४ एप्रिल रोजी परीक्षा घेतली जाणार नाही.

एमएएच-एमएचटी सीईटी २०२५ परीक्षा महाराष्ट्रातील विविध केंद्रांवर आणि राज्याबाहेरील काही ठिकाणी ऑनलाइन म्हणजेच संगणक आधारित (सीबीटी) पद्धतीने घेतली जाईल. MHT CET २०२५ मध्ये बहुपर्यायी प्रश्न (MCQ) असतील. प्रत्येक विषयासाठी १०० गुण असतील. म्हणजेच, तुम्हाला प्रत्येक विषयात १०० पैकी गुण मिळतील. महाराष्ट्र सीईटी परीक्षेचा पहिला टप्पा सकाळी ९ ते दुपारी १२ आणि दुसरा टप्पा दुपारी २ ते ५ वाजेपर्यंत असेल. ही परीक्षा पीसीएम आणि पीसीबी दोन्ही गटांसाठी असेल. परीक्षेत अकरावीच्या अभ्यासक्रमाला सुमारे २०% आणि बारावीच्या अभ्यासक्रमाला ८०% महत्त्व दिले जाईल.

### महाराष्ट्र सीईटी प्रवेशपत्र डाउनलोड असे करा

- सर्वप्रथम महाराष्ट्र सीईटी सेलच्या अधिकृत वेबसाइट mahacet.org वर जा.
- वेबसाइटवर MHT CET 2025 प्रवेशपत्र ची लिंक शोधा. तुम्हाला ही लिंक होमपेजवरच मिळेल.
- पीसीएम किंवा पीसीबी ग्रुप विभागात जा आणि लिंकवर क्लिक करा.
- तुमचा अर्ज क्रमांक आणि पासवर्ड एंटर करा. हे तेच नंबर आणि पासवर्ड आहेत जे तुम्ही नोंदणीसाठी वापरले असते.
- एकदा तुम्ही लॉगिन तपशील प्रविष्ट केल्यानंतर, तुमचे MHT CET 2025 हॉल तिकीट स्क्रीनवर दिसेल.
- महाराष्ट्र सीईटी प्रवेशपत्रावर तुमचे नाव, परीक्षेची तारीख, वेळ आणि ठिकाण यासारखे सर्व तपशील काळजीपूर्वक तपासा आणि काही चूक झाल्यास ताबडतोब अधिकाऱ्यांशी संपर्क साधा. जर सर्व काही बरोबर असेल तर प्रवेशपत्र पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करा आणि प्रिंटआउट घ्या.



# अमेरिकेत बिजनेस मॅनेजमेंटचे शिक्षण घ्यायचे?

## पदवी मिळविण्यासाठी मुख्य ५ विद्यापीठांबद्दल जाणून घ्या...

**जगभरात बिजनेस अँड मॅनेजमेंट कोर्स वेगाने लोकप्रिय होत आहेत. प्रत्येक उद्योगाला या क्षेत्रात कुशल लोकांची आवश्यकता असते. या वेगाने बदलणाऱ्या अर्थव्यवस्थेत, व्यावसायिकांची मागणी आणखी वाढत आहे. बिजनेस मॅनेजमेंटचा अभ्यास करण्यासाठी अमेरिका हे जगातील सर्वोत्तम ठिकाण मानले जाते. शतकानुशतके येथे व्यवस्थापनाशी संबंधित अभ्यासक्रम शिकवले जात आहेत. अमेरिकन संस्थांमधून पदव्या मिळवून लोकांनी व्यवसाय क्षेत्रात नाव कमावले आहे.**



अमेरिकेत शिक्षण घेण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे येथे अनेक उत्तम महाविद्यालये आणि विद्यापीठे आहेत, जे भविष्यातील इंडस्ट्री लीडर तयार करत आहेत. अमेरिकन महाविद्यालये त्यांच्या नवोन्मेष, नेतृत्व आणि रणनीतीसाठी ओळखली जातात. अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्येही अमेरिकन संस्थांचे वर्चस्व दिसून आले. जगातील टॉप-१५ बिजनेस अँड मॅनेजमेंट संस्थांच्या यादीत पाच अमेरिकन विद्यापीठे आहेत.

### अमेरिकेतील शीर्ष ५ विद्यापीठे

- हार्वर्ड विद्यापीठ : क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये, हार्वर्ड विद्यापीठाला अमेरिकेत तसेच जगात प्रथम स्थान मिळाले आहे. हार्वर्ड विद्यापीठ हे बिजनेस अँड मॅनेजमेंटचा अभ्यास करण्यासाठी जगातील पहिल्या क्रमांकाची संस्था आहे. येथे एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर १०० आहे, याचा अर्थ पदवीधरांना सहजपणे नोकऱ्या मिळतात.
- एमआयटी : मॅसॅच्युसेट्स इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एमआयटी) ही बिजनेस अँड मॅनेजमेंटच्या अभ्यासासाठी देखील एक सर्वोच्च संस्था आहे. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये एमआयटी अमेरिका आणि जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. येथे विद्यार्थ्यांची विचार करण्याची क्षमता वाढवली जाते आणि नवीन कल्पनांवर भर दिला जातो. त्यांचा एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ९५.८ आहे.
- स्टॅनफोर्ड विद्यापीठ : क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्टॅनफोर्ड विद्यापीठ अमेरिकेत आणि जगभरात तिसऱ्या क्रमांकावर आहे. ते बिजनेस अँड मॅनेजमेंट अभ्यासात त्यांची उत्कृष्टता दर्शवते. स्टॅनफोर्ड विद्यापीठाचा एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ९४.६ आहे. याचा अर्थ असा की त्यांच्या पदवीधरांना नोकरीच्या बाजारात मोठी मागणी आहे.
- पेनसिल्व्हेनिया विद्यापीठ : या अमेरिकन विद्यापीठाचे व्हार्टन स्कूल बिझनेस मॅनेजमेंटसाठी ओळखले जाते. क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये ते अमेरिकेत चौथ्या आणि जगभरात नवव्या क्रमांकावर आहे. एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ७९.८ आहे, जो उद्योगात त्याची ओळख दर्शवितो.
- कॅलिफोर्निया विद्यापीठ : या अमेरिकन विद्यापीठाने बिझनेस मॅनेजमेंटसाठी शिक्षणात चांगले नाव कमावले आहे. त्याचे गुण अनेक बाबतीत चांगले आहेत. एंप्लॉयर रेपुटेशन स्कोअर ८६.४ आहे, जो उद्योगाला त्यांच्या पदवीधरांवर किती विश्वास आहे हे दर्शवितो. जगभरात ते ११ व्या आणि अमेरिकेत पाचव्या क्रमांकावर आहे.

# निमित्ताने....

गुड इव्हिनिंग City

**उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे प्रवक्ते, राज्यसभेचे सदस्य खासदार संजय राऊत आपल्या नेहमीच्या सकाळच्या पत्रकार परिषदेमध्ये आपल्या पक्षापेक्षाही इतर राजकीय पक्षांवरच जास्त बोलत असतात हे एक आता उघड सत्य आहे. कधी महाविकास आघाडीतील त्यांच्या मित्रपक्षांपैकी काँग्रेस किंवा शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्याबाबत विधाने करतानाच अनेक वेळा संजय राऊत भाजप, एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यावरही घसरत असतात. अर्थात, संजय राऊत जे काही बोलतात आणि विधाने करतात त्याकडे दुर्लक्ष करण्याचे धोरण स्वीकारले जात असले, तरी त्यांच्या विधानावरून निश्चितच चर्चा निर्माण होते. याचा प्रत्यय त्यांच्या एका ताज्या विधानामुळेसुद्धा आला आहे.**

# नरेंद्र मोदींच्या वारसदाराची चर्चा



**पॉलिटिक्स**

**दिव्या पुजारी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी गुढीपाडव्याच्या दिवशी नागपूर येथे संघ मुख्यालयाला भेट देण्यासाठी गेले होते. त्यानंतर आपले मत व्यक्त करत असताना संजय राऊत यांनी नरेंद्र मोदी यांचा पुढील वारसदार हा महाराष्ट्रातीलच असेल असे विधान केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या इतर सर्व सहकाऱ्यांनी घाईघाईने खुलासा करून नरेंद्र मोदी यांचा वारसदार निवडण्याचा विषय सध्या समोर येऊच शकत नाही, असे म्हटले असले तरी यानिमित्ताने चर्चा मात्र सुरू झाली आहे. नरेंद्र मोदी यांचा वारसदार महाराष्ट्रातीलच असेल असे विधान जेव्हा संजय राऊत यांनी केले तेव्हा त्यांच्या डोक्यात तो वारसदार देवेंद्र फडणवीस यांच्या रूपानेच असेल असेच त्यांना सुचवायचे होते.

खरे तर यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांच्याहीपेक्षा ज्येष्ठ असलेले महाराष्ट्रातील प्रमुख नेते नितीन गडकरी यांच्या नावाचीसुद्धा राष्ट्रीय पातळीवर चर्चा सुरू होती. पण यावेळी संजय राऊत यांच्या डोक्यात नितीन गडकरी यांच्यापेक्षाही देवेंद्र फडणवीस यांचेच नाव होते हे स्पष्ट आहे. कारण, या निमित्ताने भाजपाच्या अंतर्गत पातळीवर देवेंद्र फडणवीस यांची कोंडी व्हावी हाच एक उद्देश असावा. भाजपाच्या नियमावलीमध्ये आणि पक्षीय संस्कृतीमध्ये आपली महत्त्वाकांक्षा जाहीर करणे बसत नसल्याने आतापर्यंत ज्यांनी ज्यांनी अशा प्रकारे आपली राजकीय महत्त्वाकांक्षा जाहीर केली आहे. त्यांना काही कालावधीनंतर बाजूला जावे लागले आहे याची उदाहरणे आहेत.

साहजिकच देवेंद्र फडणवीस यांनी घाईघाईने खुलासा करून ७५ वर्षांनंतरही नरेंद्र मोदी हेच पंतप्रधानपदी राहतील आणि २०२९ची लोकसभा निवडणूकही नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालीच लढवली जाईल अशी माहिती दिली. यावर्षीच्या सप्टेंबर महिन्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी वयाची ७५ वर्षे पूर्ण करत आहेत. ज्या एका तत्त्वाचा वापर करून काही वर्षांपूर्वी लालकृष्ण अडवाणी किंवा मुरली मनोहर जोशी यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांना वयाच्या कारणावरून बाजूला करण्यात येऊन मार्गदर्शकाची भूमिका देण्यात आली होती, त्याच तत्त्वाचा वापर करून ७५ वर्षे पूर्ण झाल्यावर नरेंद्र मोदी बाजूला होतील आणि त्यांचा वारसदार त्यांची जागा घेतील, असे संजय राऊत यांना सुचवायचे आहे.

## शहा, योगींबद्दल संभ्रम

हा वारसदार महाराष्ट्रातील असेल असे सांगून त्यांनी एकाच वेळी पंतप्रधानपदाचे आगामी वारसदार म्हणून नाव असलेले नरेंद्र मोदी यांचे उजवा हात अमित शहा किंवा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्याबाबतही संभ्रम निर्माण केला आहे. सध्या संरक्षणमंत्रिपद सांभाळणारे राजनाथ सिंग हेसुद्धा ज्येष्ठ असून पंतप्रधानपदाचे आगामी उमेदवार म्हणून त्यांच्याकडेही पाहिले जाऊ शकते. पण आता भाजपाने केलेल्या खुलाशाप्रमाणे पक्षाच्या घटनेमध्ये कोठेही वयाच्या ७५ वर्षांनंतर पद सोडावे लागेल, असा नियम करण्यात आलेला नाही.

## ब्रँड वाटणारा चेहरा

एखाद्या व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक क्षमता असेल तर वयाच्या ७५ व्या वर्षांनंतरही ती व्यक्ती कामकाज करू शकते अशी सारवासारव आता भाजपाने केली आहे. महत्त्वाची गोष्ट म्हणजे गेल्या ११-१२ वर्षांच्या कालावधीमध्ये भाजपाने नरेंद्र मोदी यांचा चेहरा ब्रँड म्हणून विकसित केला आहे आणि गेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये या ब्रँडने भाजपाला संपूर्ण बहुमत दिले नसले तरी सत्तेवर आणून बसवले आहे. साहजिकच आगामी कालावधीमध्ये अशाच प्रकारे निवडणुकीमध्ये यश मिळवायचे असेल तर नरेंद्र मोदी यांच्या तोलामोलाचा चेहरा कोण असेल?

## मार्गदर्शकाच्या भूमिकेत...

महत्त्वाची गोष्ट म्हणजे नरेंद्र मोदीसुद्धा आता ७५ वर्षांचे होत असून लालकृष्ण अडवाणी आणि मुरली मनोहर जोशी यांच्याप्रमाणे त्यांनीसुद्धा आता मार्गदर्शकाच्या भूमिकेत जायला हरकत नाही, असेच अप्रत्यक्षरीत्या संजय राऊत यांनी सुचवले आहे. त्याच निमित्ताने नरेंद्र मोदी यांच्या वारसदाराची चर्चाही सुरू केली आहे. भाजपाने सध्या संजय राऊत यांनी उपस्थित केलेल्या या विषयाला जास्त महत्त्व दिले नसले, तरी अशा प्रकारचा विषय आगामी कालावधीमध्ये उपस्थित होऊ शकतो याचे संकेत मात्र त्यांना मिळाले आहेत.

## भागवतांची पंच्याहत्तरी

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत हेसुद्धा यावर्षी वयाची ७५ वर्षे पूर्ण करत आहेत. संघ परिवाराच्या अलिखित नियमावलीचा विचार करून मोहन भागवत यांनी पदत्याग केला, तर आपोआपच नरेंद्र मोदी यांच्यावरही दबाव येणार आहे ही गोष्टही विसरून चालणार नाही. म्हणूनच आगामी कालावधीमध्ये कोणत्या गोष्टी घडू शकतात याचे एक चित्र संजय राऊत यांनी समोर उभे केले आहे. सध्या भाजपाने याकडे दुर्लक्ष केले असले तरी कधी ना कधी त्यांना या विषयाचा विचार गांभीर्याने करावाच लागणार आहे, हे निश्चित.



# ही कसली भिकार आयडिया?




**केंद्र सरकारने व्होडाफोन-आयडिया कंपनीमध्ये ३७ जार कोटींचे शेअर्स घ्यायचे ठरवले आहे. त्यामध्ये दहा रुपयांप्रमाणे ३ हजार ७०० कोटी शेअर्स विकत घेणार आहे. मागील काळातही व्होडाफोन-आयडिया कंपनीत असेच १६ हजार कोटी रुपये केंद्र सरकारने टाकले होते. त्यावेळीही दहा रुपयांनी शेअर्स घेतले होते. आता शेअरचा भाव साडेसहा-सातच्या आसपास आहे. म्हणजे मुळात ३० टक्के नुकसान तर इथेच केंद्र सरकारचं झालेलं आहे. आता मोठा प्रश्न पडतो की केंद्र सरकारला व्होडाफोन वाचवण्याचा इतका अट्टहास का आहे? नवीन शेअर्स घेतल्यामुळे केंद्र सरकारचेच भागभांडवल व्होडाफोनमध्ये ४९ टक्क्यांच्या आसपास जाणार आहे. म्हणजे मुख्य शेअर होल्डर्स केंद्र सरकार असणार आहे. सध्या बोर्ड तेच राहील असं म्हटलेलं आहे.**

एकीकडे केंद्र सरकार एमटीएनएल बीएसएनएल यांचे मॉनिटायझेशन करणार असं म्हणते व त्यांच्या मालमत्ता विकून पैसा गोळा करणार आहे अशा वेळी दुसरी खासगी कंपनी तीसुद्धा बुडणारी विकत कशाकरता घ्यायची? हे म्हणजे करदात्यांच्या पैशाची उधळपट्टी नव्हे का? तसेच सहा-सात रुपये असणारा शेअर दहा रुपयांनी का बरं घ्यायचा? हे सगळं गौडबंगाल सामान्यांना समजण्याच्या पलीकडचं आहे. यामध्ये नक्कीच राजकारणी, नोकरशहा आणि उद्योजक यांची काही साठ गाठ आहे का, ते पाहणे नक्कीच क्रमप्राप्त आहे. सध्या आपण केंद्र सरकारच्या दोन मोठ्या टेलिफोन कंपन्या पाहूया. सर्वात मोठी बीएसएनएल ज्याच्याकडे जवळजवळ १४ हजार टेलिफोन केंद्रे देशभरात आहेत. कंपनीमध्ये शंभर टक्के केंद्राची मालकी असून मार्च २०२४ प्रमाणे साधारण ७७ हजार कोटी रुपयांचे भागभांडवल आहे. गेल्या वर्षी कंपनीची विक्री साधारण २१ हजार ३०० कोटी रुपयांची होती व कंपनीला ५ हजार ३६७ कोटी रुपयांचा तोटा होता. दुसरी मुख्य कंपनी महानगर टेलिफोन लिमिटेड जी मुंबई व दिल्लीत मुख्यतः कार्यरत आहे. मार्च २०२४ च्या अहवालानुसार, कंपनीचे ६३० कोटी रुपयांचे भागभांडवल असून मुख्य भागधारक केंद्र सरकार यांचा साधारण ५० टक्क्यांच्याही पुढे केंद्राकडे तिचे शेअर्स आहेत. या कंपनीची एकूण विक्री गेल्या वर्षात ८०० कोटी रुपयांची होती व तिलाही साधारण ३ हजार २०० कोटी रुपयांचा तोटा होता.

**विशेष प्रतिनिधी**

## हा कुठला न्याय?

केंद्र सरकारला खरोखरच टेलिकॉममध्ये काही सुधारणा करायच्या असतील तर त्यांनी बीएसएनएल व एमटीएनएल यांचे नूतनीकरण करणे गरजेचे आहे. मुळातच त्यांच्या त्यांच्या क्षेत्रांमध्ये त्यांचं मोठं जाळं असून त्यांना नवनवीन उपकरणे, नवीन स्टाफ वगैरे भरती करून उत्तम प्रकारे चालवणे शक्य आहे. तसेच सामान्यांना परवडेल असेही केवळ मोबाइल कॉल व एसएमएस असणारे टू जी नेटवर्क देऊन सर्वसामान्य लोकांचे टेलिफोन बिल सरकार कमी करू शकते. पण एकीकडे या सरकारी कंपन्या विकून मोकळे व्हायचे व दुसऱ्या खासगी कंपनीला आपल्यात घ्यायचे हा कुठला न्याय आहे, हेच समजत नाही.

# गुड इव्हिनिंग City

८ एप्रिल २०२५, मंगळवार







# देऊळगांव राजा न.प.ची कर १ कोटी १७ लक्ष वसुली, पाणी पट्टी वसुलीही विक्रमी

**देऊळगांव राजा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** स्थानिक नगर पालिकेत ९ सप्टेंबर २०२१ रोजी मुख्याधिकारी म्हणून अरुण मोकळ रुजू झाले. तेव्हा पासून देऊळगांव नगर पालिका रिकॉर्ड ब्रेक कर वसूली करीत आहे. नागरिकांना न.प कर संदर्भात समजून सांगणे, कर पथक आपल्या दारी अशी संकल्पना राबवून त्यांच्य सुनियोजना मुळे योग्य नियोजन व कर्मचाऱ्यांच्या सहकार्यातून या नगरपरिषदने ९३ टक्के कर वसुली करुन दाखविली आहे. १ कोटी २६ लखाचा उद्दिष्ट पूर्ण करुण यावर्षी कर वसुलीच्या बाबतीत या नगरपरिषदने जिल्ह्यातून अव्वलस्थान पटकावले आहे.

शहराचा विकासात प्रशासक व मुख्यधिकारी अरुण मोकळ यांनी अनेक योजनेतून निधी खेचुन आणला त्यात शहरासाठी अनेक वर्षांपासून पिण्याच्या पाण्याचा टंचाईचा प्रश्न निर्माण झाला होता. याकरीता शासनाकडून अंतर्गत पाईपलाईन व नवीन जलशुद्धीकरण केंद्रासह पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांचे बांधकामासाठी निधी उपलब्ध करुन घेऊन काम पूर्णत्वाकडे नेल्याने शहरवासीयांना



येत्या काही काळात पिण्याचे पाणी नियमित मिळणार आहे. तीन वर्षापासून विक्रमी कर वसूली आणि पट्टी वसूली करुण जिल्ह्यातून प्रथम विक्रमी नोंद केली. सन २४–२५ मध्ये थकीत व चालू मागणी एक कोटी २६ लक्ष रुपयांची होती. त्यापैकी करदात्यांनी एक कोटी १७ लक्ष रुपयांचा कर भरणा केलेला आहे. तर पाणीपट्टीची मागणी ४८ लक्ष रुपये होती. त्यापैकी ४६ लक्ष रुपये पाणीपट्टी वसूल करण्यात आलेली आहे. कर वसुलीसाठी नगरपरिषद प्रशासनाचे एम. जे. शहा कर अधिक्षक, अहमद हुसेन, संतोष रांधवन, कैलास माने, युनूस पठाण, मोहम्मद रेहान, मनोज अग्रवाल, विकास साळवे, राजू देवउपाध्ये, शिवाजी पवार, रुस्तम मोरे, साहेबराव खरात, पवन गवई, राहुल यांच्यासोबतच अंकित बेलोकार पाणीपुरवठा पर्यवेक्षक, श्रीमती विजया शिंगणे यांनी मालमत्ता कर व पाणीपट्टी कर वसुलीसाठी सहकार्य केले.

# महावीर जयंतीला कत्तलखाने, मांसविक्री बंद

**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** जिल्ह्यात गुरुवार, १० एप्रिल रोजी महावीर जयंती तसेच शनिवार १२ एप्रिल रोजी हनुमान जयंती साजरी करण्यात येणार आहे. जयंतीनिमित्ताने कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवण्याचे आदेश अपर जिल्हाधिकारी यांनी दिले आहे. निर्बंधाच्या कालावधीत मांसविक्री होणार नाही, याची दक्षता देण्याचे निर्देशही देण्यात आले आहे.

जैन धर्मियांच्या वतीने महावीर जयंती तसेच हनुमान जयंतीनिमित्त उत्सव मिरवणूक काढण्यात येतात. सध्या विविध राजकीय पक्ष संघटनांकडून सुरु असलेली आंदोलने, औरंगजेबाची कबर काढण्याच्या कारणावरुन नागपूर येथे उद्भवलेली जातीय दंगलीची पार्श्वभूमी, राज्यातील राजकीय घडामोडी व त्यांच्याकडून विविध मागण्या संदर्भात होणारे आंदोलने, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमी, तसेच उत्सवाचा मागील इतिहास लक्षात घेता या उत्सव काळात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी दक्षता बाळगणे आणि खबरदारीच्या उपाययोजना अंमलात आणून चोख बंदोबस्त नेमणे आवश्यक असल्याने उत्सवाचे काळात दि. १० एप्रिल २०२४ रोजी श्री महावीर जयंती उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहावी, यासाठी कत्तलखाने आणि मांस विक्री दुकाने बंद ठेवावीत. तसेच कोणत्याही परिस्थितीत मांसविक्री होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आदेशात नमूद केले आहे.

# दहिद येथे दरोडा; सहा तोळे सोने लुटले

**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** दोन दिवसांपूर्वी येथून जवळच असलेल्या दहीद बु. गावांत दरोडा पडला मध्यरात्रीनंतर २ वाजेच्या सुमारास चार दरोडेखोरांनी दहीदमधील चार घरांवर दरोडा टाकला. तीन ठिकाणाहून त्यांना काही मिळाले नाही, परंतु



जिजाबाई देवकर यांच्या बंद घरातून त्यांनी ६ तोळे सोने लूटून नेले. विशेष म्हणजे चारही दरोडेखोर सिसिटीव्ही फूटेजमध्ये कैद झाले असून त्यांच्या हातात पहार, काठी, चाकू अशी साधने दिसत आहेत. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून तपास नेहमीप्रमाणे सुरु आहे.

गुड इव्हिनिंग सिटीला श्रीमती जिजाबाई ज्ञानदेव देवकर (वय ७५) यांनी सांगितले की, त्यांना राजेंद्र आणि सुभाष अशी दोन मुले आहेत. दोन्ही मुले सुनांसह बुलढाणा शहरात राहतात. त्यामुळे जिजाबाई दहीद बु. येथे आपल्या घरी कामानिमित्त जातात आणि पुन्हा परत बुलढाण्याला येतात.

शुक्रवार, ४ एप्रिल रोजी त्या दहीदला कामानिमित्त गेल्या आणि रात्री ९ वाजता जेवण आटोपून जिजाबाई पुतण्या प्रभाकरकडे झोपण्यासाठी गेल्या. सकाळी ५ वाजेच्या दरम्यान जेव्हा त्या घरी परतल्या, तेव्हा त्यांना घराचे कुलूप तुटलेले आढळले. आत जावून पाहीले असता त्यांना घरातील सामान अस्ताव्यस्त फेकलेले आणि घरून दागिन्यांचा डबा चोरलेला दिसला. जिजाबाई यांनी मधल्या खोलीतील जर्मनच्या डब्यात स्वर्गीय पतीने दिलेले दागिने जपून ठेवले होते. हा डबा दरोडेखोरांनी चोरून नेला. चोरी गेलेल्या दागिन्यांमध्ये ३ तोळ्याची गहू पोत, १ तोळ्याचे गहू मणी, सोन्याची एक दाणी, सोन्याच्या तीन अंगठया असे मिळून एकुण ६ तोळ्यांचे दागिन्यांचा समावेश आहे. ज्यांनी जिजाबाईंच्या घरी दरोडा टाकला, त्या दरोडेखोरांनी गावातीलच पुरुषोत्तम नामदेव देवकर, कुणाल शालीकराव राऊत आणि युवराज सिताराम दुतोंडे यांच्याही घरी चोरीचा प्रयत्न केला. पण त्यांना काही आढळले नसल्याने चोरी झाली नाही. या दरोड्याचा तपास एपीआय शरद माळी करीत आहेत

# नाचुन नव्हेतर वाचुन महात्मा फुले जयंती साजरी करणार



**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जयंतीची तयारी अंतीम टप्प्यात पोहोचली आहे. जयंतीनिमित्ताने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमा संदर्भातील माहिती उत्सव समितीच्यावतीने सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. जयंती उत्सवानिमित्त बुधवार ९ एप्रील रोजी सायंकाळी ४ वाजता महात्मा फुले शाळेत महिला जागर कार्यक्रमात महिलांना महात्मा ज्योतीबा फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या कार्याची माहिती देण्यात येणार आहे. १० एप्रील रोजी मुठ्ठे–ले आऊट भागातील महात्मा फुले शाळेत





सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन केंद्रीय आरोग्य मंत्री प्रता–पराव जाधव यांच्याहस्ते होणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून आ. संजय गायकवाड यांची उपस्थिती राहणार आहे. शिबिरात महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजनेंतर्गतचे तज्ञ डॉक्टर सेवा देणार आहेत. शिबिरामध्ये निदान झालेल्या दुर्धर आजाराच्या रुग्णांवर महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेतंर्गत मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहेत. ११ एप्रील रोजी सायंकाळी ५ वाजता शोभायात्रेला काढण्यात येणार आहे.

## सुरेश देवकर व कल्पना माने पुरस्काराचे मानकरी

स्व.माजी आमदार सखाराम अहेर यांचे नावाने दिल्या जाणारा सामाजिक कार्य व राजकीय पुरस्कार हा आदिती अर्बनचे अध्यक्ष सुरेश देवकर यांना घोषित करण्यात आला आहे. स्व सुभाष मानकर शैक्षणिक पुरस्कार कल्पना माने यांना घोषित करण्यात आला आहे.

## आरोग्य शिबीर अन पुरस्कार वाटप

१० एप्रिल रोजी महात्मा फुले शाळा येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला केंद्रीय आरोग्य मंत्री प्रतापराव जाधव, आ संजय गायकवाड, अतिरिक्त जिल्हाधिकारी जयश्री ठाकरे यांची उपस्थिती राहणार आहे. याचवेळी पुरस्काराचे वितरणही करण्यात येणार आहे.

# महोत्सवाला शेकडो वर्षांची परंपरा; जनुना येथे श्री रेणुका माता यात्रा

**खामगाव, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी) :** तालुक्यातील प्राचीन व जागृत देवस्थान म्हणून जनुना येथील रेणुका मातेचे मंदिर प्रसिद्ध आहे. २५० वर्षापूर्वीचा इतिहास असलेल्या श्री रेणुका मातेचे मंदिरात १२ एप्रिल हनुमान जयंतीच्या दिवशी भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

जनुना गावाचे ग्रामदैवत असलेले श्री रेणुका मातेचे मंदिर अत्यंत प्राचीन असून तालुक्यासह पंचक्रोशीत प्रसिद्ध आहे. मंदिराचा परिसर निसर्गरम्य वातावरणात असून कोरीव काम केलेल्या पाषाणाच्या या मूर्तीची टेकडीवर मंदिर बांधून स्थापना करण्यात आली. कालांतराने रेणुका मातेच्या मंदिराचा भक्तांच्या सहकार्यातून जीर्णोद्धार करण्यात आला. त्याठिकाणी नवीन



मंदिराचे बांधकाम करण्यात आले आहे. भाविकांनी देणगी स्वरूपात केलेल्या मदतीमुळे मंदिर परिसराचे व टेकडी सौंदर्याचे कामही झाले आहे. मंदिरात विराजमान असलेली कोरीव काम केलेली रेणुका मातेची मूर्ती व त्यावर चढवलेला सोन्या–चांदीचा साजशृंगार पाहून मन प्रसन्न होते. मंदिर परिसरात लक्ष्मी माता, सागर माता, शिवमंदिर व दीपमाळ आहे. येथे नवरात्र उत्सवही मोठ्या उत्साहात साजरा होतो. हनुमान जयंतीला रेणुका मातेची भव्य यात्रा भरते. यात्रेसाठी हजारोंच्या संख्येने भाविक येतात. भाविकांसाठी महाप्रसाद म्हणून १७ ते १८ क्विंटल गव्हाच्या पोळ्या व भाजीचे वाटप करण्यात येते. मातेच्या मंदिरात नवस म्हणून कोणत्याही प्रकारचा पशुबळी दिला जात नाही. यात्रेनिमित्त गावकऱ्यांची पूर्वापार चालत आलेली बारा बैलगाडी ओढण्याची पद्धत पाहायला मिळते. बैलगाडी ओढणारे गडीगळ हे मातेवर असलेल्या अपार श्रद्धेमुळे मनइच्छा बोलून बैलगाडीची संपूर्ण टेकडीला फेरी घालतात. यात्रा महोस्तावानिमित्य हजारो भाविक दूरदुरून यात्रेसाठी येतात.




# गाव पातळीवर निघणाऱ्या गौण खनिजावर झिरो रॉयल्टी !

## शासनाचा निर्णयः घरकूल लाभार्थ्यांसह शेतकऱ्यांना होणार फायदा



**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांना, घरकूल लाभार्थ्यांना आणि विविध शासकीय योजनांतील कामांकरिता एक मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. महसूल व वन विभागाने दि. ३ एप्रिल २०२५ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार, गावतळी, शेततळी, शेतविहीरी, पाझर तलाव, गावनाले, महसूली नाले, बंधारे, मामा तलाव (माजी मालगुजारी तलाव), लघुसिंचन तलाव यांचे खोलीकरण किंवा सरळीकरण करताना निघणारी माती, दगड, मुरूम व मातीयुक्त रेती यासारखे गौण खनिज आता काही विशिष्ट घटकांना स्वखर्चाने, कोणतेही स्वामित्वधन अथवा शुल्क न आकारता वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. राज्य शासनाच्या या निर्णयानुसार मातोश्री ग्राम समृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अंतर्गत होणारी कामे, विविध घरकूल योजनांचे लाभार्थी (पाच ब्रास मर्यादेत) शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतविहिरीसाठी, ग्रामपंचायत, नगरपालिका व इतर शासकीय बांधकामे करण्यासाठी हा मरुम व माती वापरता येणार आहे. त्याचबरोबर घरकुल बांधणाऱ्या लाभार्थ्यांना तसेच शेतकरी जर स्वतःची विहीर, शेततळं किंवा पाणंद रस्ता बनवू इच्छित असतील, तर त्यांनी गावतळी किंवा तलाव खोदकामातून निघालेली माती /खनिज मोफतपणे, परवानगीसह वापरता येईल. या उपयोगासाठी कोणतेही स्वामित्वधन किंवा शासकीय शुल्क आकारले जाणार नाही. ग्रामपंचायत किंवा इतर शासकीय योजनेतील कामांसाठी गौण खनिज वापरण्याची मुभा असली, तरी संबंधित बांधकाम यंत्रणांनी कंत्राटदाराच्या देयकामधून स्वामित्वधन वसूल झाले आहे की नाही, याची खातरजमा करण्याची जबाबदारी तहसीलदारांवर सोपवण्यात आली आहे. यासाठी झिरो रॉयल्टी प्रमाणपत्र देण्याचे अधिकारही तहसीलदारांनाच दिले आहेत. सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या कामांमध्ये तालुकास्त्तरावर परवाने देण्याचे काम तहसीलदार करणार असून, कोणतीही प्रक्रिया पारदर्शकतेने राबवावी, यावर भर देण्यात आला आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी, ग्रामीण भागातील लाभार्थ्यांसाठी आणि ग्रामविकासाच्या दृष्टीने हा निर्णय अत्यंत महत्वाचा ठरणार आहे

# गुटख्याची वाहतूक करणारा आरोपी पोलिसांच्या ताब्यात



**जळगाव जामोद, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : जळगाव जामोद पोलिस हद्दीतील निमखेडी फाट्या जवळ आस्वंद गावच्या व्यापाऱ्यास पोलिसांनी लाखोंच्या प्रतिबंधित गुटख्यासह अटक केली आहे त्याच्या ताब्यातील चारचाकी गाडीसह २ लाख ६५ हजार ३४७ रुपयांचा अवैध गुटखा ४ एप्रिल रोजी रात्री ८ वाजे दरम्यान जळगाव जामोद पोलिसांनी जप्त केला आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी निमखेडी फाटा येथे नाकाबंदी केली होती.

रात्री आठच्या च्या सुमारास वाहन क्रमांक एम एच ०३ एएफ ५३६५ ही गाडी संशयितरित्या भरधाव वेगाने जळगाव जामोदकडे येत होती. यावेळी उपस्थित पोलिसांनी गाडीला थांबवून झडती घेतली असता त्यामध्ये अवैध गुटखा आढळून आला. त्या अवैध गुटख्याची तक्रार अन्नसुरक्षा अधिकारी गुलाबसिंग वरतावे यांनी जळगाव जामोद पोलिस स्टेशनमध्ये केली. यामधील आरोपी उमेश दिगंबर लाये याच्या विरोधात विविध कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणाचा पुढील तपास जळगाव जामोद पोलिस स्टेशनचे ठाणेदार श्रीकांत निचड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस करीत आहेत.

# विनामूल्य डायलिसीस सेवेचा गरजूंनी लाभ घ्यावा : मंगेश चिवटे



**मेहकर, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : करमाळा नंतर ग्रामीण महाराष्ट्रातील दुसरे विनामूल्य डायलेसीस सेंटर मेहकर येथे सुरू करण्यात आल आहे या डायलिसिस सेंटरचा गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा अस आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे वैद्यकीय सहाय्यता कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले. बुलढाणा जिल्ह्यासह मेहकर आणि लोणार तालुक्यातील किडनीग्रस्त रुग्णांच्या सेवेसाठी विनामूल्य डायलिसिस केंद्र सुरू करण्यात आले आहे या डायलेसिस केंद्राचं लोकार्पण ६ एप्रिलला रामनवमीच्या पावन पर्वावर शिवसेनेचे मुख्यनेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिदे यांच्या वैद्यकीय सहायता मदत कक्षेचे प्रमुख मंगेश चिवटे यांच्या हस्ते झाले राजश्री मेडिकल आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयात झालेल्या या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना चिवटे बोलत होते ते पुढे म्हणाले की राजकीय इच्छाशक्ती असेल तर आरोग्य सेवा ही लोकांपर्यंत पोहोचल्या जाते याचं मूर्तीवंत उदाहरण म्हणजे राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि त्यांचाच वारसा पुढे नेण्याचं काम केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव हे आहेत त्यांच्यासोबत विनामूल्य डायलिसिस सेंटर सुविधा आपण जनतेला उपलब्ध करून देऊ शकतो याविषयी चर्चा झाली त्यावेळी आपण हे सेंटर मेहकर मध्ये सुरू करूया असे त्यांनी सांगितलं आणि हे सेंटर लोकांसाठी विनामूल्यरित्या सेवेत लोकार्पित होत असल्याचे चिवटे यांनी सांगतले कार्यक्रमाला केंद्रीय आयुष आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार संजय रायमुलकर, माधवराव जाधव, युवा सेनेचे महाराष्ट्र सहसचिव ऋषिकेश जाधव, सीएस डॉ.भागवत भुसारी, प्रकाश शिरोडकर, श्रीकांत खोत उपस्थित होते. यावेळी बोलताना केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले की म्हणाले की जनतेची सेवा करणार आरोग्य खात आहे या विभागाची जबाबदारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्यावर सोपवली त्यामुळेच आपल्याला जनतेची सेवा करण्याची संधी आपल्याला मिळाली केंद्र सरकारच्यावतीने ७० वर्षांपूर्ण झालेल्या वयोवृद्धना आयुष्यमान योजनेच्या व्यतिरिक्त प्रति वर्ष पाच लाख रुपये आरोग्य सेवेसाठी सरकार च्यावतीने मदत केल्या जात असल्याचे त्यांनी दिली.

दररोज ३० ते ३५ ल किडणीग्रस्त रुग्णांचे डायलिसिस या सेंटरच्या माध्यमातून होणार आहे गरजू रुग्णांनी विनामूल्य डायलेसीस सेवेचा लाभ घ्यावा अस आवाहन करण्यात आलं आहे या कार्यक्रमाला बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

# सोशल मीडियावर सट्टेबाजीचे जाळे..!

## झटपट पैशांच्या मोहापाई ग्रामीण तरुणाई अडकतेय जुगारात



**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : आजच्या डिजिटल युगात सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. तरुणाईपासून ते ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकजण सोशल मीडियावर सक्रिय आहे. मात्र, याच सोशल मीडियाचा वापर आता सट्टेबाजीच्या जाहिरातींसाठी होत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. ऑनलाइन बुकींग आणि वेग-वेगळ्या नावाने सुरू असलेल्या या जाहिरातींमध्ये क्रिकेट सामन्यांवर सट्टा लावण्याचे आमिष दाखवले जात आहे. सट्टाच्या व्यसनामुळे आजची तरुणाई सावकारी पाशात अडकून नैराशापोटी आत्महत्याचा बळी ठरत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ग्रामीण भागातील तरुणाई या जाळ्यात अडकत आहे.

सोशल मीडियावर येणाऱ्या या जाहिरातींमध्ये २४ तास सेवा, २४ तास पैसे काढण्याची सुविधा आणि २४ तास रिफिलची सुविधा असल्याचे सांगितले जात आहे. तसेच, संपर्क करण्यासाठी मोबाईल क्रमांकही देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे, या जाहिरातींमध्ये क्रिकेट सामन्यांतील खेळाडूंचे फोटो वापरले जात आहेत. त्यामुळे तरुणाई या जाहिरातींकडे आकर्षित होत आहे. सरकारने सट्टेबाजीविरोधात कठोर कायदे करुन सोशल मीडियावरील सट्टेबाजीच्या जाहिरातींवर बंदी घालण्याची गरज आहे.

तरुणाईला व्यसनांपासून दूर ठेवण्यासाठी विशेष जनजागृती मोहीम देखील राबविण्याची आवश्यकता असून, नागरिकांनी देखील सट्टेबाजी विरोधात आवाज उठवणे गरजेचे आहे. त्यांनी सोशल मीडियावर सट्टेबाजीच्या जाहिराती दिसल्यास पोलिसांना त्याची माहिती द्यावी. तसेच, आपल्या आजूबाजूच्या लोकांना सट्टेबाजीच्या दुष्परिणामांबद्दल जागरूक करावे. तरुणांनी अशा प्रकारच्या जाहिरातींना बळी पडू नये. सट्टेबाजीमुळे आर्थिक आणि मानसिक नुकसान होऊ शकते. तसेच, पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे, जेणेकरून ते अशा जाहिरातींच्या जाळ्यात अडकणार नाहीत.

### कारवाईची मागणी

सोशल मीडियावर खुलेआमपणे सुरू असलेल्या या जाहिरातींकडे पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. या जाहिरातींमुळे तरुणाई व्यसनांच्या आहारी जात असून, त्यांचे भविष्य धोक्यात आले आहे. अनेकजण सावकारी कर्ज घेऊन सट्टेबाजीमुळे कर्जबाजारी होत आहे. पोलिसांनी या प्रकरणी तातडीने कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

### पालकांनी मुलांवर लक्ष ठेवावे

आजची तरुण पिढी मोबाईलच्या व्यासनाधीनतेच्या आहारी गेले आहे. मोबाईलचा योग्य वापर करण्या ऐवजी गैरवापर केला जात असल्याने गुन्हेगारीत वाढ होत आहे. याकरीता पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवणे गरजेचे आहे. त्यांनी आपल्या मुलांना सोशल मीडियाचा योग्य वापर कसा करावा, याबद्दल मार्गदर्शन करावे. तसेच, सट्टेबाजीच्यादुष्परिणामांबद्दल त्यांना माहिती द्यावी असे आवहन पोलिसांनी केले आहे.

### सट्टेबाजीचे दुष्परिणाम

सट्टेबाजी हा एक गंभीर सामाजिक प्रश्न बनला आहे. यामुळे तरुणाईचे भविष्य धोक्यात आले आहे. सट्टेबाजीमुळे अनेक तरुण आर्थिकदृष्ट्या अडचणीत आले आहेत. तसेच, त्यांना मानसिक त्रासालाही सामोरे जावे लागत आहे. सट्टेबाजीमुळे कौटुंबिक कलह आणि गुन्हेगारीत वाढ झाल्याचे चित्र निर्माण दिसून येत आहे. यासाठी तरुणामध्ये जनजागृती बरोबरच समाज प्रबोधन करण्याची गरज आहे

# लग्नाचे आमिष दाखवून युवतीवर अत्याचार

**शेगाव, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : लग्नाचे आमिष दाखवून १९ वर्षीय युवतीवर वेळोवेळी बळजबरी शारीरिक संबंध प्रस्थापित करून पीडितेला गर्भवती केल्याची घटना १ ऑक्टोबर २०२४ ते ३० डिसेंबर २०२४ दरम्यान घडली. याप्रकरणी तक्रारीवरून सुनील मोहन सोंडकर यांच्यासह गुन्ह्यात आरोपीला सहकार्य करणारे मोहन सौंडकर, रंजना मोहन सोंडकर (सर्व रा. शेगाव) यांच्याविरुद्ध ६ एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, नातेवाइक असल्याने पीडितेला आरोपींनी घर कामासाठी त्यांच्या घरी ठेवले व यातील आरोपी सुनील सोंडकर याने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले. यामुळे पीडिता गर्भवती राहिली. तसेच जीवे मारून टाकण्याची धमकी दिली. इतर आरोपींनी त्यास सहकार्य केले. पीडितेने वाशिम जिल्ह्यातील मंगरूळपीर पोलिस ठाण्यात तक्रार दिली. घटनास्थळ शेगाव ठाण्याच्या हद्दीतील असल्याने शेगाव शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

# पीक विमा योजनेच्या निकषात होणार बदल

## आगामी खरीप हंगापासून नवीन नियम; शेतकऱ्यांमधून नाराजी



**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : राज्यातील लाखो शेतकऱ्यांसाठी दिलासा ठरलेली 'एक रुपयात पीक विमा योजना' आगामी खरिप हंगामाप-ासून बंद होणार आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत कृषी विभागाने आयुक्तांना अंमलबजावणीच्या स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकऱ्यांना भरावा लागणारा हप्ता मागील दोन वर्षांपासून राज्य सरकार भरत होते. त्यामुळे ही योजना मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचली. मात्र, लाभार्थ्यांची संख्या दुप्पट झाली, तर रब्बी हंगामात ही संख्या ९ ते १० पट वाढल्याने शासनाने हा भार कमी करण्यासाठी शेतकऱ्यांनी स्वतः हप्ता भरावा, असा निर्णय घेतला आहे. मिळालेल्या माहितीनुसार विमा कंपन्यांना प्रचंड फायदा झाला. गेल्या ८ वर्षांत विमा कंपन्यांना ४३,२०१ कोटी रुपये हप्ता देण्यात आला, मात्र त्यांनी केवळ ३२,६५८ कोटींचीच भरपाई दिली, म्हणजेच १०,५४३ कोटींचा नफा कंपन्यांना झाला. ही परिस्थिती पाहता सरकारने नव्याने निकष बदलण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या खरीप हंगामात वर्षी पीक विम्याचा लाभ मिळवायचा असल्यास शेतकऱ्यांनी नवीन निकष समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा, योजना बंद झाल्याने मोठ्या संख्येने शेतकरी विम्याच्या संरक्षणापासून वंचित राहू शकतात. सरकारच्या या निर्णयामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली असून, पुढील धोरण काय असणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

मागील हंगामांमध्ये महाराष्ट्र सरकारने स्थानिक नैसर्गिक आपत्ती, काढणीपश्चात नुकसान, प्रतिकूल हवामानामुळे पेरणी न होणे यांसारख्या बाबींचाही समावेश विमा भरपाईत केला होता. मात्र, हे ॲड-ऑन संरक्षण आता काढून टाकण्यात आले आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना पूर्वी इतकी भरपाई मिळणार नाही. शेतकऱ्यांच्या विमा कंपन्यांच्या कार्यपद्धतीबाबत तक्रारी वाढल्या आहेत. याबाबत तालुका कृषी अधिकारी यांनी सांगितले, की पिकविमा संदर्भात सद्यस्थितीत अधिकृत बदलाची कुठलीही माहिती प्राप्त नाही. परंतु वरिष्ठ पातळीवर काही बदल संदर्भातली चर्चा सुरू आहे. पीक विमामध्ये ई-पीक पाहणी, ५०% सॅटेलाईट आणि ५०% मानवी पाहणी अशा पद्धतीचा बदल होण्याची शक्यता आहे.

# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर कठोर कारवाईची मागणी

**बुलढाणा, ८ एप्रिल (गुड इव्हिनिंग सिटी)** : : दिनांक ३ एप्रिल रोजी रोजी दीनानाथ मंगेशकर रुग्णालय पुणे येथे मोनाली सुशांत भिसे यांना प्रसुती वेदना होत असताना रुग्णालय प्रशासनाने दहा लाख रुपये जमा करण्याचे, सांगितल्या नंतर घरच्यांनी तीन लाख रुपये जमा करण्याची तयारी दर्शवली तरी प्रशासनाने दखल न घेतल्यामुळे महिलेला आपले प्राण गमवावे लागले सदर महिलेने या प्रक्रियेत जुळ्या मुलींना सुद्धा जन्म दिला. परंतु आज त्या पोरक्या झाल्या त्यामुळे अण्णाभाऊ साठे फोरमचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना नेते विजय अंभोरे यांच्या आदेशाने प्रदेश कार्याध्यक्ष सोपान पानपाटील यांच्या उपस्थितीत व श्रीकृष्ण शिंदे , जिल्हाध्यक्ष अण्णाभाऊ साठे सोशल फोरम यांच्या नेतृत्वात सोमवार ७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी बुलढाणा यांना निवेदन देऊन दीनानाथ मंगेशकर रुग्णालय कारवाई करावी व मोनाली भिसे न्याय द्यावा अशी निवेदनाद्वारे मागणी केली.

याप्रसंगी जिल्हा उपाध्यक्ष मंगला निकाळजे, जिल्हाध्यक्ष ओम नाटेकर, बुलढाणा तालुका अध्यक्ष गजानन गायकवाड, जिल्हा सचिव रामा जाधव, सुधाकर सुरडकर ,शहरप्रमुख विकी विकी आव्हाड, सुरेखा सगट, द्रोपदाबाई तांबे ,लक्ष्मीबाई कोडे, अनिता विरशीद, दुर्गा दांडगे, सुनिता गायकवाड, निर्मला गायकवाड, नंदाबाई मोरे, चंदा कांबळे, रेखा मोरे ,गोपाल गायकवाड, निलेश निकाळजे, लहू कांबळे ,सूपडा गायकवाड यासह असंख्य कार्यकर्ते महिला उपस्थित होते.

सायंदैनिक गुड इव्हिनिंग City

हे पत्रक प्रकाशक, मालक रणजीतसिंग राजपूत 9850377344 यांनी कल्पक प्रिंटर्स, सराफा लाईन, बुलडाणा येथे छापून गुड इव्हिनिंग सिटी कार्यालय, गाळा क्र.२, पत्रकार भवन , बुलडाणा येथे प्रसिध्द केले. *कायदेशीर बाबी उद्‌भवल्यास बुलडाणा न्यायालयाअंतर्गत. फोन नं. (07262) 241026 संपादक : हरिदास उंबरकर 9763469184. RNI Reg.No.MAHMAR/2012/46689